# मराठी व गणित
# अध्ययन समृद्धी कार्यक्रम
# माहिती पुस्तिका

# मराठी व गणित
# अध्ययन समृद्धी कार्यक्रम माहिती पुस्तिका


प्रवर्तक : मा. ना. विनोद तावडे
मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास व वक्फ, महाराष्ट्र राज्य.

संकल्पना : मा. श्री. नंद कुमार (भा.प्र.से.)
प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
महाराष्ट्र शासन तथा राज्य प्रकल्प संचालक,
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

प्रेरणा : मा. डॉ. विपीन शर्मा (भा.प्र.से.)
आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र शासन.

मार्गदर्शन : डॉ. सुनिल मगर
संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.

समन्वय : सुजाता लोहकरे
विभाग प्रमुख (भाषा), महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.

निर्मिती व संपादन :
मराठी व गणित विभाग, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
नामेदव माळी, अधिव्याख्याता, जि. शै. सा. व्या. वि. संस्था, सांगली.
प्रतिभा भराडे, वि. अ. (शि.), बीट, कुमठे, ता. जि. सातारा.

निर्मिती सहाय्य :
उमा पाटील, सुनिता वरुडे, विद्या गाढवे, अबझल काझी, अंजली भिसे, रूपाली नावरे, वनिता निंबाळकर, सुषमा होनराव, जया कणसे, माणिक पाटील, तानाजी कुंभार

संपादन सहाय्य :
सचिन लोखंडे, विषय सहायक, मराठी, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
हनुमंत जाधव, विषय सहायक, मराठी, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
पूजा जाधव, विषय सहायक, गणित, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
भक्ती जोशी, विषय सहायक, गणित, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
वैशाली गाढवे, विषय सहायक, गणित, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.

अर्थसहाय्य : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

**विनोद तावडे**
**मंत्री**
**शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,**
**उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य,**
**अल्पसंख्याक विकास व वक्फ**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : 18 OCT 2017



## शुभेच्छा

राज्यातील १०० टक्के मुले शिकावीत या दृष्टीने राज्य शासनाने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या कार्यक्रमाची अंमलबजावणी दिनांक २२ जून २०१५ च्या शासन निर्णयानुसार सुरु आहे. केंद्र व राज्य शासनाकडून मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या संपादणुकीचे सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये मुलांची भाषा विषयातील वाचन व लेखनातील आणि गणितातील मुलभूत क्रियांमध्ये घसरण होत असल्याचे दिसून आले. या विषयातील संकल्पना दृढीकरणासाठी व मुलांना त्यातून आनंद मिळण्यासाठी भरपूर शैक्षणिक साहित्य वर्गामध्ये उपलब्ध असावयास हवे. त्या अनुषंगाने भाषा आणि गणित विषयातील विविध संकल्पनांवर आधारित साहित्य संच मुलांना उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला. त्यानुसार महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे या संस्थेने सदरचे साहित्य विकसित केले आहे.

या साहित्याच्या उपयोगातून मुले पायाभूत वाचन, लेखन व गणितातील मुलभूत क्रियांमध्ये प्रगती करणार आहेत. त्यामुळे या विषयातील संपादणूक पातळीत वाढ होण्यास मदत होणार आहे. मला विश्वास आहे की, या साहित्याचा दैनंदिन अध्ययन अध्यापनात शिक्षक व विद्यार्थी निश्चितपणे उपयोग करतील आणि निर्धारित अध्ययन फलनिष्पत्ती साध्य करतील. आपणास या कार्यात यश मिळो, या शुभेच्छासह...

**(विनोद तावडे)**

facebook.com/tawdevinod twitter.com@TawdeVinod vinodtawdeminister@gmail.com

नंद कुमार
प्रधान सचिव

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
महाराष्ट्र शासन
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक १६ ऑक्टोबर २०१७

## मनोगत

दि. २२ जून २०१५ पासून राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. मा. मुख्यमंत्री महोदय यांनी शिक्षण विभागास दिलेल्या KRA नुसार आपले राज्य शैक्षणिक गुणवत्तेत देशात पहिल्या तीन क्रमांकात यावे या उद्देश्याने आपण नियोजनबद्ध काम सुरु केले आहे. ९ जानेवारी २०१७ पासून राज्यात जलद प्रगत शैक्षणिक कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. त्याचा परिणाम म्हणून राज्यात जवळपास ५३००० शाळा प्रगत झालेल्या आहेत.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हे उद्दिष्ट साध्य करीत असताना असे लक्षात आले की राज्यातील काही विद्यार्थ्यांना मुलभूत वाचन, लेखन, व गणिती क्षमता प्राप्त करण्यात अडचणी येत आहेत. या विद्यार्थ्यांच्या परिणामकारक अध्ययनासाठी तसेच बहुवर्ग व बहुस्तरिय अध्यापनासाठी शिक्षकांनी वेळोवेळी शैक्षणिक साहित्याची मागणी केलेली आहे.

राज्यातील १०० टक्के मुले प्रगत होण्यासाठी त्यांचा शिकण्याचा पाया भक्कम हवा. औपचारिक भाषा शिक्षणात याची सुरुवात मुलभूत वाचनाने तर गणितात संख्याज्ञान व संख्यांवरील मुलभूत क्रियांनी होत असते. हे सगळे मुलांनी आनंदानी शिकायला हवे. असे झाले तरच पुढील वर्गाच्या अध्ययन निष्पत्ती साध्य होतील आणि राज्य शैक्षणिक गुणवत्तेत देशात पहिल्या तीन क्रमांकामध्ये स्थान पटकावू शकेल. या सर्व बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र विद्या प्राधिकरणाने विकसित केलेले भाषा व गणित या विषयाचे संकल्पनाधिष्ठित पुरक शैक्षणिक साहित्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांना ( इ १ली ते ५ वी) उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

मला खात्री आहे की, आपण सदर साहित्याचे उपयोगिता मूल्य जाणून त्याचा नियमितपणे उपयोग कराल आणि आगामी शैक्षणिक सर्वेक्षण अहवालात राज्य शैक्षणिक गुणवत्तेत प्रगतीपथावर आणाल.सर्वांना या कामातून यश मिळण्यासाठी शुभेच्छा !

( नंद कुमार )

डॉ. सुनिल मगर
संचालक,
महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.

प्रिय, शिक्षक बंधु-भगिनींनो,

राज्यातील प्रत्येक मूल शिकून प्रगत झाले पाहिजे हे 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रमाचे ध्येय आहे. ते साध्य करण्यासाठी राज्यातील शिक्षकांना आवश्यक ती मदत व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे ही विद्या प्राधिकरणाची जबाबदारी आहे. आपल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वसाधारणपणे ६६,१०३ शाळांपैकी ३३,७७५ शाळा द्विशिक्षकी आहेत. या सर्व शाळांमधील शिक्षकांना बहुस्तर व बहुवर्ग अध्ययन अध्यापन पद्धतीचा वापर करावा लागतो. या परिस्थितीत मुलांचे शिकणे आनंददायी, कृतियुक्त व्हावे व त्यांची स्वतःहून आणि मित्रांच्या मदतीने शिकण्याची प्रक्रिया अधिकाधिक अर्थपूर्ण व्हावी यासाठी वर्गात पुरेशा प्रमाणात दर्जेदार साहित्य उपलब्ध असणे आवश्यक आहे.

राज्यातील ज्या शाळांमधील १००% मुले शिकत आहेत त्या शाळांमध्ये वापरल्या जाणाऱ्या साहित्याची परिणामकारकता, उपयुक्तता, यशस्विता आणि त्यामागील विचार याआधारे सदरहू साहित्य तज्ज्ञांच्या मदतीने विकसित करण्यात आले आहे. या संचातील साहित्याचा सोबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार वापर केल्यास प्रत्येक मुलाचे मूलभूत भाषिक व गणिती संबोध विकसित करण्यास शिक्षकांना मदत होईल. शिवाय हे साहित्य स्वयंअध्ययनासाठी उपयुक्त ठरेल.

१००% विद्यार्थ्यांना प्रगत करण्याचे महाराष्ट्र राज्याचे ध्येय अधिक वेगाने गाठण्यासाठी हा अध्ययन समृद्धी साहित्य संच परिणामकारक ठरेल असा विश्वास वाटतो. त्यासाठी सर्व शिक्षक मित्रांना शुभेच्छा.....!

सुनिल मगर

## अध्ययन समृद्धी कार्यक्रमाविषयी थोडेसे...

भाषा व गणित अध्ययन समृद्धी कार्यक्रमांतर्गत इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतचे वर्ग असणाऱ्या शाळांना दोन्ही विषयांचे अध्ययन साहित्य संच व पुस्तिका पुरविण्यात येत आहे. वाचन-लेखन, संख्याज्ञान-संख्यावरील क्रिया यातील मूलभूत क्षमतांमध्ये मागे असणाऱ्या इयत्ता १ ली ते ५ वी मधील वेगवेगळ्या अध्ययन स्तरातील विद्यार्थ्यांसाठी हा संच उपयुक्त आहे. त्याच बरोबर मूलभूत क्षमता प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना सराव व दृढीकरणासाठी यातील काही साहित्य उपयुक्त आहे.

या साहित्य संचांत मराठीची २१०५ कार्डस् व गणिताचे ६५६ कार्डस् व विविध प्रकारच्या ७०५ वस्तू आहेत. ही कार्डस् कोणती आहेत, कशासाठी आहेत, यांच्या साह्याने वर्गात कोणत्या कृती घेता येतील, कशा घेता येतील, त्यातून मुलांचे शिकणे कसे होईल यांची माहिती शिक्षकांना होण्यासाठी ही पुस्तिका अध्ययन समृध्दी साहित्य संचासोबत देण्यात येत आहे. या पेटीतील गणिताचे साहित्य यापूर्वी शाळांना उपलब्ध करून दिलेल्या गणित पेटीतील साहित्याला पूरक आहे.

या पुस्तिकेतील क्रमबध्द कृतींच्या आधारे विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर निश्चित करून त्यांना पुढे नेता येणार आहे. विद्यार्थ्यांची बोली, कृतीचे उद्दिष्ट आणि त्यामागील विचार यांआधारे आवश्यकतेनुसार काही साहित्य शिक्षकांना स्थानिक पातळीवर तयार करावे लागेल.

शिक्षकांनी या अध्ययन समृद्धी कार्यक्रमात सुचविलेल्या कृतींमागील विचार समजून घेऊन साहित्याचा योग्य वापर केल्यास शंभर टक्के विद्यार्थी मूलभूत क्षमता प्राप्त करतील व यातील कृतींचा आनंद घेत पुढील अध्ययन स्तराकडे वाटचाल करतील.

# मराठी
# अनुक्रमणिका


| सा. क्र. | साहित्याचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ०१ | चित्र जुळविणे | १ |
| ०२ | चित्रगप्पा | २ |
| ०३ | चित्रवर्णन | २ |
| ०४ | वेगळा ओळखा | ३ |
| ०५ | वेगळे चित्र ओळखा | ३ |
| ०६ | दोन चित्रांतील फरक ओळखा | ४ |
| ०७ | चित्ररूप गोष्टी वाचन | ४ |
| ०८ | घटनाक्रम (चित्ररूप घटनाक्रम) | ५ |
| ०९ | मार्ग शोधा | ५ |
| १० | वाचनदिशा पट्टी | ६ |
| ११ | चित्र-शब्दकार्ड | ६ |
| १२ | थीम कार्ड | ७ |
| १३ | शब्दचित्र गाडी | ८ |
| १४ | समान अक्षरांची जोडी | ९ |
| १५ | चित्र वाक्यसाचे | ९ |
| १६ | सूचनापट्टी | १० |
| १७ | अक्षरगट व वाचनपाठ | १० |
| १८ | मराठी अक्षरमाला | ११ |
| १९ | चौदाखडी | ११ |
| २० | वर्णमालेनुसार शब्दांचा क्रम लावणे. | १२ |
| २१ | स्वरओळख | १२ |
| २२ | जोडाक्षर | १३ |
| २३ | शब्दपट्टी वाचन | १३ |
| २४ | शब्दकोडी | १४ |
| २५ | वाक्य तयार करणे (घनाकृती ठोकळे) | १४ |
| २६ | अर्थपूर्ण शब्द तयार करणे | १५ |
| २७ | मोठ्या शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करणे | १५ |
| २८ | वाक्यांचा घटनाक्रम | १६ |
| २९ | शब्दडोंगर | १६ |
| ३० | चित्ररूप उतारे | १७ |

| सा. क्र. | साहित्याचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३१ | उतारा | १७ |
| ३२ | 'म' ची गंमत | १८ |
| ३३ | खाचपट्टी - समानार्थी शब्द | १८ |
| ३४ | खाचपट्टी - समानार्थी शब्दगाड्या | १८ |
| ३५ | खाचपट्टी - लिंग ओळखा | १९ |
| ३६ | खाचपट्टी - विरुद्धार्थी शब्द | १९ |
| ३७ | खाचपट्टी - जोडशब्द | १९ |
| ३८ | खाचपट्टी - वाक्प्रचार व शब्दसमूह | १९ |
| ३९ | वाक्यपट्ट्या - म्हणी | २० |
| ४० | खाचपट्टी - पक्षी / प्राणी यावरून म्हणी | २० |
| ४१ | शब्दपट्टी - अक्षरांची पुनरावृत्ती असणारे शब्द | २० |
| ४२ | खाचपट्टी - घरदर्शक शब्द | २० |
| ४३ | खाचपट्टी - पिलूदर्शक शब्द | २१ |
| ४४ | खाचपट्टी - शब्दसमूहाबद्दल एक शब्द | २१ |
| ४५ | खाचपट्टी - समूहदर्शक शब्द | २१ |
| ४६ | खाचपट्टी - ध्वनिदर्शक शब्द | २१ |
| ४७ | खाचपट्टी - दृश्यदर्शक शब्द | २१ |
| ४८ | खाचपट्टी - एका शब्दाचे भिन्न अर्थ | २२ |
| ४९ | खाचपट्टी - आलंकारिक शब्द | २२ |
| ५० | गाडी - वचन ओळखा | २३ |
| ५१ | खाचपट्टी - वचन | २३ |
| ५२ | शब्दपट्टी - नाम, सर्वनाम, क्रियापद | २३ |
| ५३ | क्रियापदपट्टी | २४ |
| ५४ | विशेषणपट्टी | २४ |
| ५५ | वाक्यपट्टी - काळ ओळखा / काळ बदला | २४ |
| ५६ | शब्दपट्टी - लिंग ओळखा / वर्गीकरण करा | २४ |

# गणित
# अनुक्रमणिका



| सा. क्र. | साहित्याचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ०१ | उभी पट्टी (संख्याज्ञान भाग-१) | २५ |
| ०२ | आडवी पट्टी (संख्याज्ञान भाग-२) | २६ |
| ०३ | गाड्या - संख्याज्ञान | २६ |
| ०४ | अंककार्ड (अक्षरी) | २७ |
| ०५ | अंकपट्टी (मधली संख्या) | २७ |
| ०६ | अंकगाड्या | २७ |
| ०७ | संख्या व चित्रगाड्या | २८ |
| ०८ | भौमितिक आकारगाड्या | २८ |
| ०९ | अंकपट्टी (मागील-पुढील संख्या) | २८ |
| १० | अंककार्ड (० ते १००) | २९ |
| ११ | अंक / अक्षरी गाड्या | ३० |
| १२ | अंककार्ड (चिन्हांचा वापर) | ३० |
| १३ | संख्याकार्ड | ३१ |
| १४ | गणिती कोडे | ३१ |
| १५ | संख्यावाचन चक्र व प्लॅस्टिक त्रिकोणी आकार | ३२ |
| १६ | डायस व प्लॅस्टिक काड्या | ३२ |
| १७ | शतकपाटी | ३३ |
| १८ | संख्याक्रमगाड्या | ३३ |
| १९ | संख्या व विस्तारित रूपगाडी | ३३ |

| सा. क्र. | साहित्याचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २० | संख्याकार्ड - संख्यावाचन | ३४ |
| २१ | संख्याकार्ड - स्थानिक किंमत | ३४ |
| २२ | नोटा | ३४ |
| २३ | भौमितिक आकार | ३५ |
| २४ | मापनटेप - (मीटर) | ३५ |
| २५ | अंकपट्टी लगतची पुढील संख्या | ३६ |
| २६ | अंकपट्टी लगतची मागील संख्या | ३६ |
| २७ | बेरीज - वजाबाकी कार्ड | ३६ |
| २८ | बेरीजगाड्या | ३७ |
| २९ | वजाबाकीगाड्या | ३७ |
| ३० | गुणाकारगाड्या | ३७ |
| ३१ | भागाकारगाड्या | ३८ |
| ३२ | संख्यापट्टी - चढता व उतरता क्रम | ३८ |
| ३३ | मणिमाळ | ३८ |
| ३४ | कंपासपेटी (प्लॅस्टिक) | ३९ |
| ३५ | शतक - दांडे, सुट्टे संच | ३९ |
| ३६ | माहिती व्यवस्थापन | ४१ |
| ३७ | दशांश अपूर्णांक - अपूर्णांक कार्ड | ४१ |
| ३८ | व्यापार खेळ | ४२ |

## १. चित्र जुळविणे :

- संच क्रमांक ०१ मध्ये म/०१/०१/०१ ते म/०१/०१/१० या क्रमांकांची एकूण १० कार्डस् आहेत तसेच म/०१/०२/०१ ते म/०१/०२/९० या क्रमांकांची एकूण ९० कार्डस् आहेत.

- आकारसाम्य, आकारभेद ओळखण्यासाठी हे साहित्य आहे. वाचनपूर्व तयारी म्हणून हे साहित्य वापरता येईल.



- शिक्षकांनी विद्यार्थ्याला एका वेळी एक कार्ड क्रमाने द्यावे.
  एका कार्डावरील चित्रे जुळविता येऊ लागल्यानंतर दुसऱ्या प्रकारचे कार्ड द्यावे.

- विद्यार्थी कार्डावरील चित्रांचे निरीक्षण करतील.
  सुट्ट्या चित्रातील तसेच स्वतंत्र चित्र कार्डावरील चित्रावर ठेवतील.

- या संचातील चेहऱ्यावरील विविध भाव असणाऱ्या चित्राची पाहणी करून चित्र जुळविताना सूक्ष्म निरीक्षण करणे, अंदाज बांधणे, तुलना करणे या क्रिया घडतात. या कृती करताना विद्यार्थ्याच्या मेंदूला आव्हान असते.
  मेंदूला आव्हान मिळाल्याने एकाग्रता वाढेल, त्यामुळे दोन अक्षरांतील फरक ओळखण्यासाठी या सरावाचा फायदा होईल.
  उदा. प-फ, ट-ठ.

## २. चित्रगप्पा :

- संच क्रमांक ०२ मध्ये म/०२/०१ ते म/०२/२२ या क्रमांकांची एकूण २२ कार्डस् आहेत.

- चित्राचे निरीक्षण करून गप्पा मारणे यासाठी मुलांना हे साहित्य वापरता येईल.



- शिक्षक विद्यार्थ्यांना चित्र दाखवतील, विद्यार्थी चित्राचे निरीक्षण करतील.
  चित्राला अनुसरून प्रश्न-उपप्रश्न विचारून मुलांशी गप्पा मारतील.
  उदा. मुले काय करत आहेत? ● मुलांना आनंद का झाला आहे? ● मुले आनंदाने काय बोलत असतील?
- काही चित्रांवर गप्पा झाल्यानंतर इतर चित्रांवर गप्पा मारण्यासाठी चित्रे गटामध्ये देतील.
- गटातील सरावानंतर ही कृती वैयक्तिक करून घ्यावी.

## ३. चित्रवर्णन :

- संच क्रमांक ०३ मध्ये म/०३/०१ ते म/०३/१५ या क्रमांकांची एकूण १५ कार्डस् आहेत.



- एका चित्राचे वर्णन शिक्षक करतील. वर्णन करताना काय विचार केला, हे विद्यार्थ्यांना सांगतील. या चित्रात मुले आहेत, या चित्रात मुली आहेत, या चित्रात झाड आहे - अशी ठरावीक साच्याची वाक्ये सुरुवातीला विद्यार्थी तयार करतात. चित्राला प्रश्न विचारण्याची सवय झाल्यानंतर वर्णनात सलगता येते.
- चित्र वर्णन करण्यापूर्वी चित्रातील विविध पात्रांचा एकमेकांशी कसा संबंध असेल? व नंतर काय घडू शकेल? चित्रातील पात्रांचा निसर्गाशी व निसर्गाचा पात्रांशी काय संबंध असेल? मुले एकमेकांशी काय बोलत असतील? या विषयी अंदाज करून विद्यार्थ्यांना वर्णन करण्यास सांगावे.

★ प्रत्येक विद्यार्थ्याला एका वेळी एक चित्र सरावासाठी द्यावे.

## ४. वेगळा ओळखा :

- संच क्रमांक ०९ मध्ये म/०९/०१/०१ ते म/०९/०१/२५ ही अक्षरातील फरकांची एकूण २५ कार्डस् आहेत तसेच म/०९/०२/०१ ते म/०९/०२/२० ही चित्रातील फरकांची एकूण २० कार्डस् आहेत.

- चित्रपट्टी व अक्षरचित्रपट्टीचे निरीक्षण करून त्यातील वेगळे चित्र ओळखण्यासाठी हे साहित्य वापरता येईल.




| | | | |
|---|---|---|---|
| भ | भ | भ | म |

- विद्यार्थी चित्रपट्टी समोर ठेवतील आणि चित्रांतील वेगळे चित्र ओळखतील.
- चित्रपट्टीतील चित्र ओळखण्याचा सराव झाल्यानंतर शिक्षकांनी अक्षर चित्रपट्टी विद्यार्थ्यांना वेगळे चित्र ओळखण्यासाठी द्यावी.

## ५. वेगळे चित्र ओळखा :

- संच क्रमांक ०४ मध्ये म/०४/०१ ते म/०४/१२ या क्रमांकांची एकूण १२ कार्डस् आहेत.

- बारकाईने निरीक्षण करून दिलेल्या कार्डावरील चित्राच्या आकारातील साम्य ओळखणे, भेद ओळखणे, चित्रांचे वर्गीकरण करता येणे यासाठी या चित्रकार्डांचा उपयोग करता येईल.




- सोप्याकडून कठिणाकडे अशा क्रमाने शिक्षकांनी चित्रकार्डस् द्यावीत.
- सुरुवातीला समूहात व नंतर वैयक्तिक चित्रकार्ड द्यावे.
- एका वेळी एकच चित्रकार्ड द्यावे.
- अशा आकाराच्या निरीक्षणाची सवय मुलांना लागेल. ही शब्द, अक्षरे यांच्यातील साम्य व फरक ओळखण्याची पूर्वतयारी आहे.

## ६. दोन चित्रांतील फरक ओळखा :

- संच क्रमांक ०५ मध्ये म/०५/०१ ते म/०५/१२ या क्रमांकांची एकूण १२ कार्डस् आहेत.

- एका कार्डावर एकसारखी दिसणारी दोन चित्रे आहेत. या चित्रांमध्ये काही बाबतीत फरक आहे. मुलांनी चित्रातील फरक शोधण्यासाठी हे साहित्य आहे.



- निरीक्षण करणे, सूक्ष्म निरीक्षण करणे, ठरवून निरीक्षण करणे यामध्ये निरीक्षणाची सवय लागते. विचार करणे, निरीक्षण, तुलना, साम्य-भेद, अंदाज, तर्क करणे, इत्यादी गोष्टींचा सराव होतो.
- चित्रवर्णन, गोष्ट लिहिण्यासाठीही या चित्रांचा वापर करता येईल.

## ७. चित्ररूप गोष्टी वाचन :

- संच क्रमांक ०७ मध्ये म/०७/०१/०१ ते म/०७/०१/०६, म/०७/०२/०१ ते म/०७/०२/०६, म/०७/०३/०१ ते म/०७/०३/०७, म/०७/०४/०१ ते म/०७/०४/०७, या क्रमांकांची एकूण २६ कार्डस् आहेत.

- या साहित्याच्या आधारे एका गोष्टीतील विविध प्रसंगांची चित्रे जुळवून सलग गोष्ट सांगता येईल.






- हे साहित्य वापरण्यापूर्वी शिक्षकांनी या साहित्यातील गोष्टी विद्यार्थ्यांना ऐकवाव्यात.
- ऐकवलेल्या गोष्टीचा संच विद्यार्थ्यांना द्यावा.
- विद्यार्थी प्रथम गोष्टीस अनुसरून क्रम लावतील.
- या संचातील क्रम लावून झाल्यावर विद्यार्थ्यांना गोष्ट सांगण्याची संधी द्यावी.

## ८. घटनाक्रम (चित्ररूप घटनाक्रम) :

● संच क्रमांक ०८ मध्ये म/०८/०१/०१ ते म/०८/०१/०६, म/०८/०२/०१ ते म/०८/०२/०६, म/०८/०३/०१ ते म/०८/०३/०६, म/०८/०४/०१ ते म/०८/०४/०६, म/०८/०५/०१ ते म/०८/०५/०६, म/०८/०६/०१ ते म/०८/०६/०६, म/०८/०७/०१ ते म/०८/०७/०६, म/०८/०८/०१ ते म/०८/०८/०४, म/०८/०९/०१ ते म/०८/०९/०४, म/०८/१०/०१ ते म/०८/१०/०४, या क्रमांकांची एकूण ५४ कार्डस् आहेत

● विद्यार्थ्यांनी पाहिलेल्या कृती व घटनेचा सलगतेने विचार करता यावा आणि मांडणी करता यावी, यासाठी या साहित्याचा उपयोग होईल.




● संचाची मांडणी करून विद्यार्थी निरीक्षण करतील. ● योग्य क्रमाने संचातील चित्रे लावतील.
● घटनाक्रमाचे तोंडी वर्णन करतील.

## ९. मार्ग शोधा :

● संच क्रमांक १० मध्ये म/१०/०१ ते म/१०/०५ या क्रमांकांची एकूण ०५ कार्डस् आहेत.

● विद्यार्थ्यांची बैठक व एकाग्रता वाढविणे, तर्कसंगत विचार करता येणे यासाठी हे साहित्य आहे.





● विद्यार्थ्यांना कोडी घालणे व कोडी सोडविणे याची आवड असते. एकाच प्रकारचे कोडे सारखे सोडविण्यात रस वाटत नाही. यासाठी शिक्षकांनी विविध प्रकारची कोडी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावीत.
● यामध्ये विद्यार्थ्यांच्या मेंदूला आव्हान आहे. कोड्यातील मार्ग शोधण्यामध्ये विद्यार्थी गुंततो, विचार करतो, पडताळून बघतो, अंदाज घेतो, निर्णय घेतो, पुन्हा-पुन्हा कृती करतो. यातून त्याची एकाग्रता वाढते, तर्कसंगत विचार करतो व कोडे सोडवितो. यासाठी एका जागी स्थिर बसण्याने विद्यार्थ्यांची बैठक वाढते.

## १०. वाचन दिशापट्टी :

- संच क्रमांक ०६ मध्ये म/०६/०१ ते म/०६/१० या क्रमांकांची एकूण १० कार्डस् आहेत.

- विद्यार्थ्यांना डावी-उजवी बाजू समजणे, डावीकडून-उजवीकडे वाचन सराव होणे, लेखनपूर्व तयारी यासाठी हे साहित्य आहे.



- चित्रपट्टी पाहून सिंह गुहेकडे कसा जाईल यासाठी शिक्षक त्या मार्गावरून बोट फिरवून दाखवतील. नंतर विद्यार्थ्यांना त्याप्रमाणे बोट फिरवायला सांगतील.
- इतर चित्रपट्ट्या विद्यार्थ्यांना सरावासाठी देतील.
- दिशापट्टीच्या वाचनाचा सराव झाल्यावर या पट्टीवर मुलांना रांगोळी/चाळलेली माती चिमटीने सोडण्यास द्यावी. यामुळे हाताच्या बोटांची लेखनासाठीची पकड तयार होते.

## ११. चित्र-शब्दकार्ड :

- संच क्रमांक ११ मध्ये म/११/०१ ते म/११/१०० या क्रमांकांची एकूण १०० कार्डस् आहेत तसेच चित्र कार्ड व शब्द कार्ड प्रत्येकी १०० अशी एकूण ३०० कार्डस् आहेत.

- वाचन शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी हे साहित्य वापरता येईल.
- यामध्ये चित्रशब्दकार्ड, चित्रकार्ड व शब्दपट्ट्या असे मिळून ५ चित्रशब्दांचा संच तयार केला आहे.

उदा. - फळे, पक्षी, वाहन, प्राणी.




- प्रत्येक विद्यार्थ्याला एक संच (पाच चित्र-शब्दकार्ड्स) द्यावा. पुढे दिलेल्या क्रमाने शिक्षकांच्या देखरेखीखाली चित्र-शब्दकार्ड्स जुळवून घ्यावीत.

कृती १. : संचातील चित्रशब्दकार्ड विद्यार्थी समोर ठेवतील. एकेका चित्रावर बोट ठेवून चित्राचे वाचन करतील.
उदा. - मांजर, बैल, घोडा, गाय, कुत्रा.




- चित्राखालील शब्द पाहून वाचतील व शब्दावर बोट ठेवतील.
- या शब्दातील अक्षरे वाचणे अपेक्षित नाही. चित्राखालील शब्द हे चित्र म्हणून वाचतील.

कृती २. : समोर असणाऱ्या चित्रासारखे दुसरे चित्र शोधतील व चित्रावर चित्र ठेवतील.




कृती ३. : चित्राखालील शब्द पाहून त्याच शब्दाची पट्टी त्या शब्दावर ठेवतील.

- पाच चित्र-शब्दांची खालीलप्रमाणे कृती होईल.




कृती ४. : स्वतंत्र शब्द घेऊन (चित्राशिवाय) शब्द वाचतील.

मांजर बैल घोडा गाय कुत्रा

विद्यार्थ्यांनी वाचलेल्या संचांची स्वतंत्र नोंद शिक्षकांनी ठेवावी.
एका संचातील सर्व शब्द (चित्राशिवाय फक्त शब्द) वाचायला आल्यानंतरच दुसरा संच द्यावा.

## १२. थीम कार्ड :

- संच क्रमांक २४ मध्ये म/२४/०१ ते म/२४/१० या क्रमांकांची एकूण १० कार्डस् आहेत.

- शब्दसंपत्ती वाढविणे, वाक्यरचना करता येणे, विषयासंबंधी बोलता येणे तसेच आपण जे बोलतो तेच लिहिता येते याचा अनुभव देण्यासाठी हे साहित्य वापरता येईल.



- शिक्षकांनी एक चित्र घेऊन विद्यार्थ्यांशी चर्चा करावी. चर्चेदरम्यान येणारे शब्द, वाक्ये शिक्षकांनी फळ्यावर लिहावीत.
- कार्डमधील चित्र व त्यास अनुसरून चर्चा केल्यानंतर सदर चित्र मध्यवर्ती राहते आणि त्याविषयी माहिती प्राप्त होते. विद्यार्थ्यांच्या अनुभवविश्वातील अनेक शब्दांपैकी योग्य शब्द थीमशी जोडता येणे, त्याचा संदर्भ जोडता येणे यासाठी हे साहित्य आहे.
- याशिवाय पुढील स्तरावरील विद्यार्थ्यांशी परिच्छेद, वर्णन, माहिती लिहिण्याबाबत चर्चा करावी. त्यानंतर विद्यार्थ्यांना लिहिण्यास वेळ द्यावा. विविध थीम घेऊन चर्चा करता येईल. उदा.– जत्रा, बाजार, शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रम इ.

## १३. शब्दचित्र गाडी :

- संच क्रमांक १२ मध्ये म/१२/०१/०१ ते म/१२/०१/०५, म/१२/०२/०१ ते म/१२/०२/०५, म/१२/०३/०१ ते म/१२/०३/०५, म/१२/०४/०१ ते म/१२/०४/०५ व म/१२/०५/०१ ते म/१२/०५/०५ या क्रमांकांची प्रत्येक गटात ५ प्रमाणे एकूण २५ कार्डस् आहेत.

- वाचनाची पूर्वतयारी करण्यासाठी हे साहित्य आहे.
- यामध्ये ५ चित्रे व या चित्रांची नावे असलेल्या शब्दपट्ट्या आहेत. असे गाडीचे ५ डबे एका संचात आहेत. गाडीची सुरुवात बाणाने होते. शेवट स्माईलीने होतो.





- यापूर्वी चित्रशब्दकार्ड वाचनाचा सराव घेतलेला असावा. त्याच चित्रशब्दांच्या गाड्या या कृतीसाठी घ्याव्यात. प्रथम गाडीचे (सुटे भाग) डबे विस्कळीत करून विद्यार्थ्यांना द्यावेत. त्यातून विद्यार्थी चित्र व शब्द जोडून गाडी पूर्ण करतील. ही कृती करत असताना विद्यार्थी चित्र व शब्द यांचे निरीक्षण करतील.

★ शिक्षकांनी एका गाडीतील डब्यांची मांडणी प्रथम समूहात करून घ्यावी. त्यानंतर ही कृती गटात व वैयक्तिक करून घ्यावी.

## १४. समान अक्षरांची जोडी :

- संच क्रमांक १८ मध्ये म/१८/०१ ते म/१८/५१ या क्रमांकांची १०२ कार्डस् आहेत. (५१ जोड्या)

- या साहित्याचा वापर खालीलप्रमाणे करता येतो.
  अक्षरांमधील साम्य लक्षात घेऊन अक्षरचित्रे जुळविणे.
  अक्षरगटातून अक्षरे शिकून झाल्यानंतर सरावासाठी अक्षर जुळविणे.




## १५. चित्र वाक्यसाचे :

- संच क्रमांक १३ मध्ये म/१३/०१/०१ ते म/१३/०१/२० या क्रमांकांची अक्षरातील फरकांची एकूण २० कार्डस् आहेत तसेच म/१३/०२/०१ ते म/१३/०२/२० या क्रमांकांची चित्रातील फरकांची एकूण २० कार्डस् आहेत.

- विद्यार्थ्यांना एका दृष्टिक्षेपात वाक्य वाचता येणे, वाक्यरचना करता येणे यासाठी हे साहित्य आहे.




- शिक्षकांनी पहिली पट्टी विद्यार्थ्यांच्या मदतीने वाचावी. चित्र वाक्यसाचा देण्यापूर्वी या साच्यातील चित्रे ही चित्र-शब्दकार्ड वाचन सरावात वाचलेली असावीत.
- दिलेल्या पट्ट्यांचे या पद्धतीने वाचन झाल्यावर चित्रावर स्वतंत्र दिलेली शब्दपट्टी ठेवून या पट्ट्यांचे पुन्हा वाचन घ्यावे.
- या कृतीचा गटात तसेच वैयक्तिक सराव घ्यावा.

## १६. सूचनापट्टी :

- संच क्रमांक १४ मध्ये म/१४/०१/०१ ते म/१४/०१/१०, म/१४/०२/०१ ते म/१४/०२/१०, व म/१४/०३/०१ ते म/१४/०३/१० या क्रमांकांची प्रत्येक गटात प्रत्येकी १० तसेच म/१४/०४/०१ ते म/१४/०४/०५ या क्रमांकांची ०५ कार्डस् आहेत. (एकूण ३५ कार्डस् )

- यामध्ये एका कृतीची सूचना, दोन कृतींची सूचना असणाऱ्या पट्ट्या आहेत. विद्यार्थ्यांना लक्षपूर्वक ऐकण्याचा सराव होणे, सूचना ऐकून कृती करता येणे यासाठी हे साहित्य आहे.





- शिक्षक प्रथम समूहामध्ये एक कृतीची सूचना असणाऱ्या सूचनांचा डबा ठेवतील.
- एक विद्यार्थी त्या डब्यातील एक सूचनापट्टी घेऊन शिक्षकांकडे देईल.
- सूचनापट्टीवरील सूचना शिक्षक मोठ्याने वाचतील.
- विद्यार्थी सूचनेनुसार कृती करतील.
- वाचन यायला लागल्यानंतर गटप्रमुख ही कृती गटात घेतील.
- एका कृतीची सूचना समजून विद्यार्थ्यांना सहजतेने कृती यायला लागल्यानंतरच शिक्षकांनी दोन कृती असलेल्या सूचनापट्ट्यांचा वापर करावा.
- या क्रमानेच शिक्षकांनी तीन, चार कृतींच्या सूचनांचा टप्पा वाढवावा.

## १७. अक्षरगट व वाचनपाठ :

- संच क्रमांक १६ मध्ये म/१६/०१ ते म/१६/०६ या क्रमांकांची एकूण ०६ कार्डस् आहेत.

- हे साहित्य फक्त शिक्षकांसाठी आहे. (विद्यार्थ्यांनी वापरण्यासाठी नाही)
- विद्यार्थ्यांना सर्व अक्षरे सलग अक्षरमालेप्रमाणे शिकवण्याऐवजी अक्षरांचे गट करून अक्षरे शिकवावीत. अक्षरगटाबरोबर ठरावीक स्वर देऊन त्यापासून शब्द तयार करून घ्यावेत. या शब्दांच्या आधारे शिक्षकांनी वाक्ये करावीत. या वाक्यांच्या आधारे वाचनपाठ तयार करावेत.



अक्षरगटावरील वाचनपाठ

अक्षरगट क्र.१ म क र ब घ ा

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| मामा | काम | बघ | मारा | राम | कर | घर |

वाक्यवाचन
१. रामा काम कर.
२. मामा काम बघ.

वाचनपाठ
१. राम बघ.
२. राम काम बघ
मामा घर बघ.
मामा काम कर.



अक्षरगट क्र.२ म क र ब घ ा ग स प व त ो ि

| | | | | |
|---|---|---|---|---|
| साप | कप | वरात | गारा | घर |
| वास | केर | वारा | मगर | कविता |
| काम | करा | बारा | काका | सविता |

वाक्यवाचन
१. काका साप बघ.
२. सविता मगर बघ.
३. कविता केक काप.
४. मामा केक घे.

वाचनपाठ
१. काका केक बघ.
काका केक घे.
२. सविता कविता कर.
सविता वरात बघ.
सविता काम कर.

★ अक्षरगट तयार करताना परिसरातील भाषेत वापरल्या जाणाऱ्या शब्दांमध्ये जी अक्षरे वारंवार येतात, ती अक्षरे प्रथम घ्यावीत. त्यामुळे या अक्षरापासून अधिकाधिक शब्द तयार होतील.

- अक्षरांचे गट करून शिकवल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिकण्याचे ओझे कमी होते, वाचन सहज होते, शिकण्याचा आनंद मिळतो.
- विद्यार्थ्यांना अक्षरगटातील अक्षरे व स्वर वाचता आल्यामुळे शब्द वाचता येतात. वाचनपाठ वाचता येतो, आनंद मिळतो व आत्मविश्वास वाढतो.
- साहित्यामध्ये दिलेल्या क्रमांकानुसार अक्षरगट घ्यावेत किंवा शिक्षकाने अक्षरगट केले असल्यास पहिल्या गटातील अक्षरे व स्वर पुढच्या गटात घेण्यात यावेत.

## १८. मराठी अक्षरमाला :

- संच क्रमांक १७ मध्ये म/१७/०१ या क्रमांकाचे ०१ कार्ड आहे.




- स्वर-स्वरादी, व्यंजने, संयुक्त व्यंजने यांच्या अभ्यासासाठी या साहित्याचा वापर करावा.

## १९. चौदाखडी :

- संच क्रमांक १९ मध्ये म/१९/०१ ते म/१९/०२ या क्रमांकांची एकूण ०२ कार्डस् आहेत.

- वर्णमालेतील अक्षरांचा सराव होण्यासाठी तसेच स्वरांचे व स्वरादी चिन्हांचे दृढीकरण होण्यासाठी या साहित्याचा वापर करावा.




- शिक्षकांनी विद्यार्थ्याला प्रत्येकी एक कार्ड द्यावे. त्याचे वाचन करून घ्यावे. आडवे-उभे, सुरुवातीकडून, शेवटाकडून अशा विविध प्रकारे वाचन करून घ्यावे.
- क, व, ग यासारख्या ठरावीक अक्षरांना ऋ जोडून (कृ, वृ, गृ) जोडाक्षरे तयार होतात.
- लृ या स्वरापासून क्लृप्तीसारखे ठरावीक शब्द तयार होतात. त्यामुळे ऋ व लृ चा समावेश या कार्डांमध्ये केलेला नाही.
- शिक्षकांनी ऋ पासून तयार झालेले शब्द असलेले उतारे विद्यार्थ्यांना देऊन वाचन सराव घ्यावा.

## २०. वर्णमालेनुसार शब्दांचा क्रम लावणे :

- संच क्रमांक २० मध्ये म/२०/०१ ते म/२०/२५ या क्रमांकांची एकूण २५ कार्डस् आहेत.

- दिलेल्या शब्दांचा क्रम वर्णमालेनुसार लावणे, तसेच शब्दकोशाचा वापर करण्यासाठीची पूर्वतयारी या साहित्यातून होईल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पिसारा | हरण | पापड | आंबा | कमल | उमा |
| आंबा | उमा | कमल | पापड | पिसारा | हरण |


- शिक्षकांनी विविध प्रकारचे शब्द देऊन ते वर्णमालेनुसार लावून घ्यावेत व सराव घ्यावा. त्याबरोबर विद्यार्थ्यांना विविध शब्दकोश दाखवावेत, त्यातील शब्दांच्या क्रमाविषयी चर्चा करावी.

## २१. स्वरओळख :

- संच क्रमांक २१ मध्ये म/२१/०१/०१ ते म/२१/०१/५०,........, म/२१/१३/०१ ते म/२१/१३/५०, या क्रमांकांची प्रत्येक स्वरांपासून तयार होणारी ६५० कार्डस् आहेत. (प्रत्येकी ५० कार्डांचे १३ संच)

- स्वरचिन्ह वापरून होणाऱ्या शब्दातील अक्षरांचे स्वर उच्चारानुसार ओळखणे, या सरावासाठी हे साहित्य वापरावे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उचल | ऊस | ऊब | एकदा | केक | फॅन | चॅम्पियन |
| तुतारी | नूलकर | नूरजहाँ | तेनालीराम | थेऊर | गॅस | फॅक्स |

- स्वरानुसार शब्दपट्टी ठेवण्यासाठी चौदा खोकी/डबे ठेवावेत. डब्यांवर स्वरांची नावे लिहावीत.
  उदा. – 


- विद्यार्थ्यांनी शब्दपट्टी वाचावी व संबंधित स्वराच्या डब्यात/ खोक्यात शब्दपट्टी ठेवावी.
- काही शब्दांमध्ये दोनपेक्षा जास्त स्वर असतील, तर दोनपैकी कोणत्याही स्वराच्या खोक्यात पट्टी टाकल्यास मान्य करावे.
  उदा. – तुतारी हा शब्द ऊ, आ, ई यापैकी कोणत्याही खोक्यात टाकता येईल.

## २२. जोडाक्षर :

- संच क्रमांक २६ मध्ये म/२६/०१/०१ ते म/२६/०१/२०,....., म/२६/०६/०१ ते म/२६/०६/५० या क्रमांकांची एकूण १८० कार्डस् आहेत. (४ संचात २० कार्डस् व २ संचात ५० कार्डस्)

- जोडाक्षरवाचनासाठी, सरावासाठी हे साहित्य उपयोगी आहे.
- जोडाक्षर कसे तयार झाले, हे शिक्षकांनी सुरुवातीस विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| स्मृती | दर्शन | प्रसिद्‌ध | कैऱ्या | शक्कल | भक्ती |

- या कार्डच्या सहाय्याने पुढील प्रमाणे कृती घेता येतील.
- शिक्षकांनी गटात १० ते १५ कार्ड द्यावीत व विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनेनुसार कार्डांचे गट करण्यास सांगावे.
- तयार झालेल्या कार्डांच्या गटावर चर्चा करवून घ्यावी.
- याशिवाय विशिष्ट प्रकारची जोडाक्षरे असणाऱ्या शब्दकार्डांचे गट करून घ्यावेत. उदा. क्या, त्या, प्र इ.

## २३. शब्दपट्टीवाचन :

- संच क्रमांक २७ मध्ये म/२७/०१ ते म/२७/१२ या क्रमांकांची एकूण १२ कार्डस् आहेत.

- समान अक्षराने सुरुवात किंवा शेवट असणारे शब्द तयार करण्यासाठी हे साहित्य वापरता येईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री | मान | कांत | धर | निवास |

- शिक्षक डाव्या हाताचे बोट 'श्री'वर ठेवतील, उजव्या हाताचे बोट 'मान' या शब्दावर ठेवतील आणि 'श्रीमान' असा शब्द वाचतील. डाव्या हाताचे बोट स्थिर ठेवून उजव्या हाताचे बोट पुढील शब्दावर नेतील आणि मुले 'श्रीकांत' असा शब्द वाचतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ब | पु | चो | झिप | ऱ्या |


- याप्रकारे शेवटी सारखे अक्षर असणारे शब्द तयार करता येतील. उदा. – बऱ्या, पुऱ्या..........
- शिक्षकांनी प्रथम शब्दपट्टीचे वाचन समूहात घ्यावे नंतर गटात व शेवटी वैयक्तिक करण्यास द्यावे.
- याप्रमाणे समान अक्षराने सुरुवात व शेवट होणारे शब्द तयार करून घ्यावेत.

## २४. शब्दकोडी :

- संच क्रमांक २९ मध्ये म/२९/०१ ते म/२९/१२ या क्रमांकांची एकूण १२ कार्डस् आहेत.

- विद्यार्थ्यांमध्ये शोधकवृत्ती वाढविणे, शब्दसंग्रह वाढविणे, एकाग्रता वाढविणे यासाठी या साहित्याचा उपयोग करता येईल.




- शिक्षकांनी समूहात शब्दकोडे सोडविण्याचे प्रात्यक्षिक घ्यावे. प्रत्येक गटामध्ये कार्ड देऊन कोडी सोडवून घ्यावीत. वैयक्तिक कार्ड देऊन शब्दकोडी सोडविण्याचा सराव घ्यावा. विविध प्रकारची शब्दकोडी विद्यार्थ्यांना सरावासाठी द्यावीत.
- विद्यार्थी शब्दकोड्यातील अक्षरांचे निरीक्षण, वाचन करतील. ● अक्षरे जुळवून अर्थपूर्ण शब्द शोधतील.
- शोधलेल्या शब्दांचे लेखन करतील.

## २५. वाक्य तयार करणे (घनाकृती ठोकळे) :

- यामध्ये कर्ता, विशेषण, कर्म, क्रियापद याप्रमाणे चार ठोकळे आहेत. एका ठोकळ्यावर चारही बाजूंना कर्ता लिहिला आहे. याच पद्धतीने पुढचे तीन ठोकळे आहेत.
- विद्यार्थ्यांना कर्ता, विशेषण, कर्म आणि क्रियापद यांचा उपयोग करून वाक्य तयार करण्यासाठी या साहित्याचा वापर करता येतो.




- सुरुवातीस हे ठोकळे समूहात विद्यार्थ्यांसमोर ठेवावेत. त्या ठोकळ्यांचे विद्यार्थ्यांकडून वाचन करून घ्यावे. कर्ता, विशेषण  कर्म, क्रियापद यांचा विचार करून वाक्यरचना करून घ्यावी. नंतर वाक्यवाचन घ्यावे.
  उदा.– वेदिकाने गोड आंबा खाल्ला.

- समूहात सराव झाल्यावर ही कृती गटात, वैयक्तिक घ्यावी.
- यासारखे जास्तीत जास्त ठोकळे तयार करून अधिकाधिक वाक्ये तयार करता येतील.
  पुढील स्तरावर शब्दांच्या जाती शिकविताना हे साहित्य वापरता येईल.

## २६. अर्थपूर्ण शब्द तयार करणे :

- संच क्रमांक २२ मध्ये म/२२/०१ ते म/२२/१० या क्रमांकांची एकूण १० कार्डस् आहेत.

- अक्षरगटापासून अर्थपूर्ण शब्द तयार करून वाचन करणे यासाठी हे साहित्य वापरता येते.

म रं नो ज न

- या अक्षरगटापासून मनोरंजन हा अर्थपूर्ण शब्द तयार होतो. या प्रकारचे वेगवेगळे अक्षरगट घेऊन अर्थपूर्ण शब्द तयार करता येतील.

## २७. मोठ्या शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करणे :

- संच क्रमांक ३० मध्ये म/३०/०१ ते म/३०/१० या क्रमांकांची एकूण १० कार्डस् आहेत.

- शब्दपट्टीवरील शब्दातील अक्षरांचा वापर करून विविध अर्थपूर्ण शब्द तयार करण्यासाठी या शब्दपट्ट्या वापरता येतील.

अक्षरनंदन

- शिक्षकांनी अशा शब्दांमध्ये लपलेले अर्थपूर्ण शब्द तयार करून घ्यावेत. ही कृती प्रथम समूहात करावी, नंतर गटात व शेवटी वैयक्तिक करून घ्यावी.


- विद्यार्थी पट्टीवरील अक्षरे वापरून दोन, तीन, चार अक्षरी शब्द तयार करतील.
  उदा. – दर, नंदन, अक्षर इ.

## २८. वाक्यांचा घटनाक्रम :

- संच क्रमांक २५ मध्ये म/२५/०१/०१ ते म/२५/०१/०८, म/२५/०२/०१ ते म/२५/०२/०८, म/२५/०३/०१ ते म/२५/०३/१२, म/२५/०४/०१ ते म/२५/०४/१०, म/२५/०५/०१ ते म/२५/०५/१०, म/२५/०६/०१ ते म/२५/०६/०६,

या क्रमांकांची एकूण ५४ कार्डस् आहेत.

- एखाद्या घटनेबाबत दिलेली वाक्ये कालानुक्रमे लावता येणे, सुसंगतपणे विचार करता येणे, विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागणे यासाठी हे साहित्य वापरता येते.





- वाक्यांच्या घटनाक्रमांचा समावेश श्रवण, संभाषणातील उपक्रम राबविताना करण्यात यावा. शिक्षकांनी या घटनाक्रमाची वर्गात चर्चा घ्यावी. विद्यार्थ्यांकडून घटनाक्रम लावून घ्यावेत. शिक्षकांनी अधिक सरावासाठी विविध घटनाक्रमांतील घटनांचा सराव घ्यावा. उदा. – शाळेत येण्यापूर्वीची केलेली तयारी, चहा बनविण्याची कृती इ.

## २९. शब्दडोंगर :

- संच क्रमांक २८ मध्ये म/२८/०१ ते म/२८/०२ या क्रमांकांची एकूण ०२ कार्डस् आहेत.

- एक शब्द दिला असता त्या शब्दामध्ये एक–एक शब्द मिळवत पूर्ण वाक्यांची रचना करावी. यामधून वाक्यामध्ये शब्दांचा वापर करण्याचा सराव होतो. शब्दडोंगर तयार झाल्यानंतरचे चित्र कसे दिसते; याचे उदाहरण म्हणून हे साहित्य आहे.
- हे साहित्य शिक्षकांसाठी आहे.




- शिक्षक फळ्यावर एक शब्द लिहितील.
  उदा.- 'आई' त्यामध्ये 'आहे' हा नवा शब्द मिळवून 'आई आहे' हे वाक्य तयार करतील.
- विद्यार्थ्यांना शब्द विचारून तो वरील वाक्यात समाविष्ट करून वाक्य लिहितील. उदा.- 'आई माझी आहे' याप्रमाणे एकेक शब्द वाढवून जास्तीत जास्त अर्थपूर्ण वाक्ये तयार करून फळयावर एकाखाली एक लिहितील. फळ्यावरील सर्व मजकूर मुलांकडून तयार करून घेतील. याप्रमाणे ही कृती गटात व वैयक्तिक घेतील.

## ३०. चित्ररूप उतारे :

- संच क्रमांक २३ मध्ये म/२३/०१ ते म/२३/०९ या क्रमांकांची एकूण ०९ कार्डस् आहेत.

- यामध्ये शब्द व चित्र यांचा संदर्भ जोडून वाक्य तयार करून वाचायचे आहे. याप्रमाणे उतारा वाचन करायचे आहे.





- शिक्षकांनी सुरुवातीला विद्यार्थ्यांच्या मदतीने एका कार्डाचे समूहात वाचन घ्यावे, त्यानंतर गटात वाचन घ्यावे, शेवटी विद्यार्थ्याला वैयक्तिक वाचन द्यावे.

## ३१. उतारा :

- संच क्रमांक ३१ मध्ये म/३१/०१ ते म/३१/०५ या क्रमांकांची एकूण ०५ कार्डस् आहेत.

- प्रकटवाचन, अनुलेखन, आकलनासह वाचन, प्रश्ननिर्मिती, विरामचिन्हांचा वापर करणे. नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद शोधणे इ. साठी या साहित्याचा वापर करता येईल.



**हिरकणी**

हिरकणी गवळण रायगडाच्या पायथ्याशी राहत होती. एके दिवशी ती दूध विकायला गडावर गेली होती. सूर्यास्ताला गडाचे दरवाजे बंद झाले. घरी तिचा लहान मुलगा एकटाच होता. त्यामुळे हिरकणीला कसेही करून घरी परत यायचेच होते, ती गडावरील सर्व दरवाजांजवळ गेली. परंतु तिला खाली उतरण्याचा मार्ग सापडला नाही. शेवटी एका उंच तुटलेल्या कड्यावरून ती खाली उतरली. खाली उतरताना तिचे कपडे फाटले, शरीरावर जखमा झाल्या, परंतु बाळाच्या ओढीने ती संकटावर मात करून घरी आली. शिवाजी महाराजांना ही गोष्ट माहीत झाली. त्यांनी हिरकणीच्या धाडसाचे कौतुक केले. त्या कड्यावर बुरूज बांधला व त्या बुरूजाला हिरकणी बुरूज असे नाव दिले.

## ३२. 'म'ची गंमत :

- संच क्रमांक १५ मध्ये म/१५/०१ या क्रमांकाचे ०१ कार्ड आहे.

- यामध्ये 'म' या अक्षराची पुनरावृत्ती केलेली आहे. अक्षराच्या पुनरावृत्तीमुळे होणारी गंमत समजणे, वाचनाची गोडी लावणे, वाचनातील आनंद घेणे इत्यादीसाठी हे साहित्य वापरता येईल.

*** 'म' ची गंमत ***

मी, माझ्या मैत्रिणी मिनू व मितालीकडे मंगळवारी निघाले. आधी मी मिनूकडे गेले. मिनूकडे तिची मंगला मामी होती. तिने आम्हाला मुगाचे लाडू दिले. मग आम्ही मितालीकडे निघालो. मिताली मोडक्या खुर्चीवर बसली होती. मान व हात हलवून तिने आम्हाला बोलावले. मितालीने आम्हाला मक्याचे कणीस खायला दिले. माठातले गार पाणी प्यायलो. मग आम्ही मागच्या अंगणातून माडीवर गेलो. तिथे मितालीचा भाऊ माधव व त्याचे मित्र 'माझ्या मामाचे पत्र हरवले, ते मला सापडले' हा खेळ खेळत होते.

- शिक्षकांनी सर्व वाचनपाठ झाल्यानंतर हे साहित्य मुलांना वाचनासाठी द्यावे. इतर अक्षरांचे असे परिच्छेद तयार करून किंवा मिळवून विद्यार्थ्यांना वाचनास द्यावेत.

# * पुढील सर्व साहित्य सरावासाठी उपयुक्त आहे *


## ३३. खाचपट्टी - समानार्थी शब्द :

- संच क्रमांक ३८ मध्ये म/३८/०१ ते म/३८/०३ या क्रमांकांची एकूण १३ कार्डस् आहेत.





## ३४. खाचपट्टी - समानार्थी शब्दगाड्या

- संच क्रमांक ५४ मध्ये म/५४/०१ ते म/५४/१० या क्रमांकांच्या १० गाड्यांमध्ये ८० कार्डस् आहेत.




## ३५. खाचपट्टी – लिंग ओळख :

- संच क्रमांक ३६ मध्ये म/३६/०१ ते म/३६/१४ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे २८ कार्डस् आहेत.





## ३६. खाचपट्टी – विरुद्धार्थी शब्द :

- संच क्रमांक ३७ मध्ये म/३७/०१ ते म/३७/२१ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ या प्रमाणे ४२ कार्डस् आहेत.





## ३७. खाचपट्टी – जोडशब्द :

- संच क्रमांक ३९ मध्ये म/३९/०१ ते म/३९/१९ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे ३८ कार्डस् आहेत.





## ३८. खाचपट्टी – वाक्प्रचार व शब्दसमूह :

- संच क्रमांक ४० मध्ये म/४०/०१ ते म/४०/०३ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे ०६ कार्डस् आहेत.




## ३९. वाक्यपट्ट्या – म्हणी :

- संच क्रमांक ४१ मध्ये म/४१/०१ ते म/४१/०३ या क्रमांकांची प्रत्येकी ०३ याप्रमाणे ०९ कार्डस् आहेत.




## ४०. खाचपट्टी – पक्षी/प्राणी यांवरून म्हणी :

- संच क्रमांक ४२ मध्ये म/४२/०१ ते म/४२/१३ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे २६ कार्डस् आहेत.




## ४१. शब्दपट्टी – अक्षरांची पुनरावृत्ती असणारे शब्द :


- संच क्रमांक ४३ मध्ये म/४३/०१ ते म/४३/२४ या क्रमांकांची एकूण २४ कार्डस् आहेत.




शब्दपट्टी घेऊन त्या शब्दाचा वाक्यात उपयोग करा.
उदा. – आंब्याच्या पानांची सळसळ वनीताला ऐकू आली.


## ४२. खाचपट्टी – घरदर्शक शब्द :

- संच क्रमांक ४४ मध्ये म/४४/०१ ते म/४४/११ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे २२ कार्डस् आहेत.




## ४३. खाचपट्टी – पिलूदर्शक शब्द :

- संच क्रमांक ४५ मध्ये म/४५/०१ ते म/४५/१० या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे २० कार्डस् आहेत.





## ४४. खाचपट्टी – शब्दसमूहाबद्दल एक शब्द :

- संच क्रमांक ४६ मध्ये म/४६/०१ ते म/४६/१३ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे २६ कार्डस् आहेत.





## ४५. खाचपट्टी – समूहदर्शक शब्द :

- संच क्रमांक ४९ मध्ये म/४९/०१ ते म/४९/१३ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ या प्रमाणे २६ कार्डस् आहेत.





## ४६. खाचपट्टी – ध्वनिदर्शक शब्द :

- संच क्रमांक ५० मध्ये म/५०/०१ ते म/५०/१२ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे २४ कार्डस् आहेत.





## ४७. खाचपट्टी – दृश्यदर्शक शब्द :

- संच क्रमांक ५१ मध्ये म/५१/०१ ते म/५१/०३ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे ०६ कार्डस् आहेत.



## ४८. अ) खाचपट्टी – एका शब्दाचे भिन्न अर्थ :

● संच क्रमांक ४७ मध्ये म/४७/०१ ते म/४७/११ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे २२ कार्डस् आहेत.







## ब) शब्दपट्टी – एका शब्दाचे भिन्न अर्थ :


● संच क्रमांक ५८ मध्ये म/५८/०१ ते म/५८/१० अशा क्रमांकांची एकूण १० कार्डस् आहेत.


**पाट**

शब्दांचे भिन्न अर्थ विद्यार्थ्यांकडून काढून घ्यावेत.
प्रत्येक अर्थाच्या शब्दाचा वापर होणारी वाक्ये तयार करावीत.
उदा.–
१) रूपाली पाटावर जेवायला बसली.
२) अंजलीच्या शेळीला आज पाट झाली.
३) विद्या व वनीताने शेतीला पाटाने पाणी दिले.


## ४९. खाचपट्टी – आलंकारिक शब्द :


● संच क्रमांक ५२ मध्ये म/५२/०१ ते म/५२/१४ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे २८ कार्डस् आहेत.




भाग २ : संच क्रमांक ४८ मध्ये म/४८/०१ ते म/४८/१४ या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे २८ कार्डस् आहेत.



## ५०. गाडी – 'वचन' ओळख :

- संच क्रमांक ५५ मध्ये म/५५/०१/०१ ते म/५५/०१/०५ व म/५५/०२/०१ ते म/५५/०२/०५ या क्रमांकांची प्रत्येक गाडीत ०५ याप्रमाणे १० कार्डस् आहेत.





## ५१. खाचपट्टी – वचन :

- संच क्रमांक ५६ मध्ये म/५६/०१ ते म/५६/१० या क्रमांकांची प्रत्येकी ०२ याप्रमाणे २० कार्डस् आहेत.




## ५२. शब्दपट्टी – नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद :

- संच क्रमांक ५७ मध्ये म/५७/०१ ते म/५७/२२ या क्रमांकांची एकूण २२ कार्डस् आहेत.




- शब्दपट्ट्यांचे नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद यानुसार वर्गीकरण करा.

## ५३. क्रियापदपट्टी - वाक्यात उपयोग करा :

● संच क्रमांक ३२ मध्ये म/३२/0१ ते म/३२/२० या क्रमांकांची एकूण २० कार्डस् आहेत.

**काढणे**

उदा. - मुलांनी पाटीवर चित्र काढले.

## ५४. विशेषणपट्टी - वाक्यात उपयोग करा :

● संच क्रमांक ३३ मध्ये म/३३/0१ ते म/३३/१५ या क्रमांकांची एकूण १५ कार्डस् आहेत.

**प्रशस्त**

उदा. - ही इमारत प्रशस्त आहे.


## ५५. वाक्यपट्टी - काळ ओळखा/काळ बदला :

● संच क्रमांक ३४ मध्ये म/३४/0१ ते म/३४/१७ या क्रमांकांची एकूण १७ कार्डस् आहेत.

**मी जेवलो.**

## ५६. शब्दपट्टी - लिंग ओळखा/वर्गीकरण करा :

● संच क्रमांक ३५ मध्ये म/३५/0१ ते म/३५/२७ या क्रमांकांची एकूण २७+१ अशी २८ कार्डस् आहेत.





# गणित



## १) उभी पट्टी (संख्याज्ञान भाग - १) :

- संच क्रमांक ६१ मध्ये ग/६१/०१ ते ग/६१/२० या क्रमांकांची एकूण २० कार्डस् आहेत.

- संख्याज्ञानाच्या प्रत्येक टप्प्यावर या साहित्याचा वापर करावयाचा आहे.

कृती क्र.१ : संख्या क्रमाने वाचता येणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ६ | ११ | १६ | २१ |
| २ | ७ | १२ | १७ | २२ |
| ३ | ८ | १३ | १८ | २३ |
| ४ | ९ | १४ | १९ | २४ |
| ५ | १० | १५ | २० | २५ |


- प्रत्येक संख्याज्ञानाच्या टप्प्यावर हे साहित्य विद्यार्थ्यांना द्यावे.
- साहित्यातील संख्यावाचन विद्यार्थी क्रमाने करतील.

कृती क्र.२ : संख्यापट्टीवरील कोणतीही संख्या विद्यार्थ्यांना विचारली असता सांगता येणे.

| |
|---|
| २१ |
| २२ |
| २३ |
| २४ |
| २५ |

- संख्यापट्टीवरील संख्यांचे विद्यार्थी वाचन व लेखन करतील.

कृती क्र.३ : अंकासमोर वस्तू मांडता येणे.




- वरीलप्रमाणे विद्यार्थी अंकांसमोर वस्तूंची मांडणी करतील.
- १० च्या पुढे मांडलेल्या वस्तूंचा गड्डा करतील.
- ११ या संख्येपासून गड्डा-सुट्टे (दशक, एकक) प्रमाणे वस्तूंची मांडणी करतील.

कृती क्र.४ : अशा पद्धतीने संख्यापट्टीची मांडणी करून सम-विषम, मूळ-संयुक्त संख्या ओळखणे, टप्प्याने संख्या ओळखणे, बेरीज-वजाबाकी करणे हे अनुभव विद्यार्थ्यांना देता येतील.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११ | २१ | ३१ | ४१ | ५१ | ६१ | ७१ | ८१ | ९१ |
| २ | १२ | २२ | ३२ | ४२ | ५२ | ६२ | ७२ | ८२ | ९२ |
| ३ | १३ | २३ | ३३ | ४३ | ५३ | ६३ | ७३ | ८३ | ९३ |
| ४ | १४ | २४ | ३४ | ४४ | ५४ | ६४ | ७४ | ८४ | ९४ |
| ५ | १५ | २५ | ३५ | ४५ | ५५ | ६५ | ७५ | ८५ | ९५ |
| ६ | १६ | २६ | ३६ | ४६ | ५६ | ६६ | ७६ | ८६ | ९६ |
| ७ | १७ | २७ | ३७ | ४७ | ५७ | ६७ | ७७ | ८७ | ९७ |
| ८ | १८ | २८ | ३८ | ४८ | ५८ | ६८ | ७८ | ८८ | ९८ |
| ९ | १९ | २९ | ३९ | ४९ | ५९ | ६९ | ७९ | ८९ | ९९ |
| १० | २० | ३० | ४० | ५० | ६० | ७० | ८० | ९० | १०० |


कृती क्र .५ : या संख्यापट्टीचा चढता-उतरता क्रम / दोन संख्येतील लहान-मोठेपणा / संख्या उलट क्रमाने वाचता येणे इ. साठी वापर करता येईल.

## २) आडवी पट्टी (संख्याज्ञान भाग - २) :

- संच क्रमांक ६२ मध्ये ग/६२/०१ ते ग/६२/२० या क्रमांकांची एकूण २० कार्डस् आहेत.

- संख्याज्ञानाच्या प्रत्येक टप्प्यावर हे साहित्य वापरायचे आहे.

  कृती : संख्या क्रमाने वाचता येणे. उदा. (११,१२,१३........)






- पट्टीवरील कोणताही अंक विचारला असता सांगता येणे, अंकाखाली वस्तू मांडता येणे, चढता-उतरता क्रम सांगता येणे, मागील-पुढील संख्या सांगता येणे, संख्येचा टप्पा सांगता येणे इ. अनुभव या साहित्याच्या आधारे देता येतील.

## ३) गाड्या - संख्याज्ञान :

- संच क्रमांक ६० मध्ये ग/६०/०१ ते ग/६०/०५ या क्रमांकांची एकूण ०५ कार्डस् आहेत.

- हे साहित्य सरावासाठी वापरायचे आहे.




- शिक्षक विद्यार्थ्यांच्या मदतीने समुहात गाडी जोडून घेतील. गाडी जोडताना बाणाचे चिन्ह प्रथम ठेवायचे आहे व शेवटी स्माईली येईल याबाबत शिक्षक कल्पना देतील.
- शिक्षकांनी सुरूवातीला समुहात, नंतर गटात व वैयक्तिक या क्रमाने हे साहित्य विद्यार्थ्यांना वापरण्यास द्यावे. याप्रमाणे सर्व गाड्या जोडण्याची कृती करावी.
- संख्याज्ञानाच्या पहिल्या टप्प्यावर ही गाडी वापरायची आहे.

## ४) अंककार्ड (अक्षरी) :

● संच क्रमांक ६३ मध्ये ग/६३/०१ ते ग/६३/१०० या क्रमांकांची एकूण १०० कार्डस् आहेत.

● संख्येचे अक्षरी वाचन व लेखन सरावासाठी हे साहित्य वापरायचे आहे.

● कृती क्र.१ : विद्यार्थी अंककार्ड (अक्षरी) वाचतील.

| | |
|---|---|
| एक | दोन |

● कृती क्र. २ : अक्षरासमोर अंककार्डाची मांडणी करतील.


| | |
|---|---|
| सात | ७ |

● अंककार्ड व अक्षरकार्ड यांची जोडी लावता येणे, अक्षरी संख्या दाखवली असता अंक दाखवता येणे, अंक दाखवला असता अक्षरी संख्या दाखवता येणे इ. चा अनुभव विद्यार्थ्यांना या साहित्याच्या आधारे देता येईल.

## ५) अंकपट्टी (मधली संख्या) :

● संच क्रमांक ६४ मध्ये ग/६४/०१ ते ग/६४/०८ या क्रमांकांची एकूण ०८ कार्डस् आहेत.

● संख्याज्ञानाच्या टप्प्यावर मधली संख्या ओळखणे या सरावासाठी या साहित्याचा वापर होतो.





● शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सरावासाठी पट्ट्या द्याव्यात, सोबत सुट्या कार्ड मधील उत्तराच्या कार्डासहित काही कार्डस् द्यावीत. विद्यार्थी अंकपट्टीवर रिकाम्या जागी अंककार्ड ठेवतील. प्रथम शिक्षक समुहात नंतर गटात व वैयक्तिक कृती करून घेतील.

## ६) अंकगाड्या :

● संच क्रमांक ६५ मध्ये ग/६५/०१ ते ग/६५/०५ या क्रमांकांची एकूण ०५ कार्डस् आहेत.


● हे साहित्य सरावासाठी आहे.



## ७) संख्या व चित्रगाड्या :

- संच क्रमांक ६६ मध्ये ग/६६/०१ ते ग/६६/०५ या क्रमांकांची एकूण ०५ कार्डस् आहेत.


- हे साहित्य सरावासाठी आहे.



## ८) भौमितिक आकारगाड्या :

- संच क्रमांक ६७ मध्ये ग/६७/०१ ते ग/६७/०५ या क्रमांकांची एकूण ०५ कार्डस् आहेत.


- हे साहित्य सरावासाठी आहे.




## ९) अंकपट्टी (मागील – पुढील संख्या) :

- संच क्रमांक ६८ मध्ये ग/६८/०१ ते ग/६८/१० या क्रमांकांची एकूण १० कार्डस् आहेत.

- हे साहित्य सरावासाठी आहे.




- साहित्यामध्ये १ ते १०० संख्याकार्डांचा वापर करावा. सुरुवातीला शिक्षकांनी समुहात विद्यार्थ्यांकडून कार्डावर संख्या मांडून घ्यावी. नंतर गटात व वैयक्तिक कृती करून घ्यावी.



## १०) अंककार्ड (० ते १००) :

- संच क्रमांक ६९ मध्ये ग/६९/०१ ते ग/६९/१०१ या क्रमांकांची दोन समान संच असलेली एकूण २०२ कार्डस् आहेत.

- संख्याज्ञान

  १. विद्यार्थ्यांना संख्यावाचनाचा अनुभव देता येईल.

| | | |
|---|---|---|
| ५ | १० | १५ |

  २. अंककार्डाच्या साह्याने संख्या तयार करण्याचा अनुभव देता येईल.
  उदा. : १२३ ही संख्या तयार करा.

| | | |
|---|---|---|
| १ | २ | ३ |


- अंककार्ड व अक्षरकार्ड जोड्या लावणे.

| | |
|---|---|
| २५ | पंचवीस |

- शून्याची ओळख व वापर

  उदा. पाच अंककार्ड व त्यासमोर शिक्षक विद्यार्थ्यांकडून वस्तूंची मांडणी करून घेतील. पाच वस्तूतून एक वस्तू कमी केली असता येणारा अंक व वस्तूची मांडणी विद्यार्थी करतील. अशाप्रमाणे शून्याची ओळख करून देण्याचा अनुभव देता येईल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | ४ | ३ | २ | १ | ० |



- बेरीज व वजाबाकी

  उदा. अंककार्ड घेऊन बेरीजेची उदाहरणे सोडविण्याचा अनुभव देणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | + | ३ | = | ७ |

  वरील उदाहरणाप्रमाणे वजाबाकीची उदाहरणे सोडविण्याचा अनुभव देता येईल.

- टप्प्याने संख्या मांडणे


२ | ४ | ६ | ८ | ______ | ______

- सम-विषम संख्या ओळखणे, पुढील-मागील संख्या सांगणे, लहान-मोठी संख्या सांगणे, शतकापुढील संख्या तयार करता येणे, संख्या क्रमाने लावता येणे, चढता-उतरता क्रम लावता येणे, मूळ संख्या व संयुक्त संख्या ओळखता येणे, इत्यादी कृतींचाही अनुभव विद्यार्थ्यांना देता येईल.

## ११) अंक/अक्षरी गाड्या :

- संच क्रमांक ७० मध्ये ग/७०/०१ ते ग/७०/०५ या क्रमांकांची एकूण ०५ कार्डस् आहेत.
- संच क्रमांक ७५ मध्ये ग/७५/०१ ते ग/७५/०५ या क्रमांकांची एकूण ०५ कार्डस् आहेत.

- हे साहित्य संख्याज्ञान सरावासाठी आहे.







## १२) अंककार्ड (चिन्हांचा वापर) :

- संच क्रमांक ७१ मध्ये ग/७१/०१ ते ग/७१/२० या क्रमांकांची एकूण २० कार्डस् आहेत.

- या साहित्याचा वापर दोन संख्यांमधील लहान-मोठेपणा, सारखेपणा ओळखून (<, >, =) या चिन्हांचा वापर करण्याचा अनुभव देता येईल.

१० | ६० | > | <

१० | < | ६०


- संच क्रमांक ७२ मध्ये ग/७२/०१ ........... ग/७२/२० या क्रमांकांची एकूण २० कार्डस् आहेत.

५६ | > | ४१

## १३) संख्याकार्ड :

- संच क्रमांक ७३ मध्ये ग/७३/०१/०१ ते ग/७३/०१/०३, ग/७३/०२/०१ ते ग/७३/०२/०३ व ग/७३/०३/०१ ते ग/७३/०३/०३ या क्रमांकांची एकूण ०९ कार्डस् आहेत.

- हे साहित्य सरावासाठी आहे.





विद्यार्थ्यांना आकृतीत दाखवलेल्या संख्या घेऊन दोन अंकी, तीन अंकी, चार अंकी संख्या तयार करण्याचा अनुभव देता येईल.
उदा. - १३, ५६, १३५, ६३१५

## १४) गणिती कोडे :

- संच क्रमांक ७४ मध्ये ग/७४/०१ या क्रमांकाचे ०१ कार्ड आहे.

- हे सराव साहित्य आहे. यासाठी ० ते १०० या संख्याकार्डांचा वापर करावा.




## १५) संख्या-वाचन-चक्र :

● संच क्रमांक ७६ मध्ये ग/७६/०१ या क्रमांकाचे ०१ कार्ड आहे.

### प्लॅस्टिक त्रिकोणी आकार :

● संच क्रमांक ७६ मध्ये ग/९४/०१ या क्रमांकाचे ४५ त्रिकोणी आकार आहेत.




१. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चक्रावरील रंग दशक, एकक इत्यादीसाठी प्रतिक म्हणून वापरले आहेत हे स्पष्ट करावे.

२. प्लॅस्टिक त्रिकोण कसे टाकावेत याचे प्रात्यक्षिक करून दाखवावे.
उदा. - १) चक्रापासून चार बोटे वर ओंजळीत प्लॅस्टिक त्रिकोण घेऊन चक्रावर टाकावेत. त्या-त्या रंगाच्या कक्षेत पडलेले प्लॅस्टिक त्रिकोण एकत्र करावेत.

२) पिवळ्या रंगाच्या कक्षेत पाच प्लॅस्टिक त्रिकोण पडले, तर ते सर्व त्याच कक्षेत एकत्र करावेत व मोजावेत. जेवढे प्लॅस्टिक त्रिकोण, तेवढे शतक. (पाच प्लॅस्टिक त्रिकोण म्हणजे पाच शतक) याप्रमाणे सर्व रंगांच्या कक्षेतील प्लॅस्टिक त्रिकोण ज्या-त्या स्थानानुसार एकत्र करून संख्यावाचन करावे.

● या साहित्याचा वापर करून पाच अंकी संख्या तयार करणे, संख्यावाचन, संख्या अंकी व अक्षरी लेखन, संख्येची स्थानिक किंमत, विस्तारित मांडणी, चढता-उतरता क्रम, मागील-पुढील संख्या, बेरीज, वजाबाकी इ. करता येण्यासाठी हे साहित्य आहे.


## १६) डायस व प्लॅस्टिक काड्या :

● संच क्रमांक ९१ मध्ये ग/९१/०१ या क्रमांकाचे ०१ डायस आहे.

### प्लॅस्टिक काड्या :

● संच क्रमांक ९० मध्ये ग/९०/०१ ते ग/९०/२० या क्रमांकांच्या २० काड्या आहे.


● दशकाचा सराव करण्यासाठी हा खेळ आहे. डायस जमिनीवर टाकला असता वरती जेवढे ठिपके आहेत, तेवढ्या प्लॅस्टिक काड्या खेळणाऱ्या मुलाने स्वतःजवळ घ्याव्यात.



● दहा काड्या जवळ आल्या की, रबराने गट्ठा तयार करावा. ज्या विद्यार्थ्याकडे जास्त गट्ठे, तो विजयी. हा खेळ प्लॅस्टिक काड्यांऐवजी आईस्क्रिम काड्या वापरून खेळता येतो. दशक संकल्पना स्पष्ट होण्यासाठी या खेळाचा उपयोग होतो. एककाचे बंदे रूप म्हणजे एक गट्ठा याची विद्यार्थ्यांना समज येते. हा खेळ दोघांत, तिघांत, चौघांत खेळता येतो. याशिवाय या साहित्याचा उपयोग तोंडी उदाहरणे तयार करण्यासाठी होईल.

## १७) शतकपाटी :

- संच क्रमांक ७७ मध्ये ग/७७/०१ या क्रमांकाचे ०१ कार्ड आहे.



- या खेळामध्ये वेगवेगळ्या आकाराच्या रिंगा/बांगड्या वापराव्यात.
- दोन विद्यार्थी खेळायला बसतील. शतक पाटीवर एक विद्यार्थी रिंग टाकेल. दुसरा विद्यार्थी रिंगच्या आत असणारे ठिपके मोजून स्वतःच्या वहीवर मांडेल व वाचेल. नंतर दुसरा विद्यार्थी रिंग टाकेल. पहिला विद्यार्थी ठिपके मोजून स्वतःच्या वहीवर संख्या मांडेल व वाचेल.
- रांगोळीच्या मदतीने बंदिस्त व खुली आकृती तयार करतील.

- गोल रिंग पाटीवर टाकून रिंगच्या आतील ठिपके मोजतील.
- व्हाईट बोर्डवर मार्कर पेनने भौमितिक आकृत्या काढतील. (परमनंट मार्कर पेन वापरू नये.)
- ठिपके जोडून रांगोळी तयार करतील.
- ठिपके जोडून भौमितिक आकार तयार करतील.
- या शतकपाटीच्या मदतीने एक अंकी, दोन अंकी संख्यांची निर्मिती करतील. पाटीवर रांगोळीच्या साह्याने टप्प्याने येणाऱ्या संख्या तयार करून वाचतील. तयार केलेल्या संख्या चढत्या-उतरत्या क्रमाने मांडतील. संख्येतील दोन-दोन ठिपक्यांच्या जोड्या लावून सम-विषम संख्या शोधतील.
  उदा. २५ ही संख्या (विषम) अशी दाखवता येईल.

## १८) संख्याक्रम गाड्या :

- संच क्रमांक ७८ मध्ये ग/७८/०१ ते ग/७८/०५ या क्रमांकांची एकूण ०५ कार्डस् आहेत.


- हे साहित्य सरावासाठी आहे.




## १९) (संख्या व विस्तारित रूप) गाडी :

- संच क्रमांक ७९ मध्ये ग/७९/०१/०१ ते ग/७९/०१/०५ या क्रमांकांची एकूण ०५ कार्डस् आहेत.

- हे साहित्य सरावासाठी आहे.



## २०) संख्याकार्ड – संख्यावाचन :


- संच क्रमांक ८० मध्ये ग/८०/०१/०१ ते ग/८०/०१/१०, ग/८०/०२/०१ ते ग/८०/०२/१०, ग/८०/०३/०१ ते ग/८०/०३/१० व ग/८०/०४/०१ ते ग/८०/०४/१० या क्रमांकांची एकूण ४० कार्डस् आहेत.




- हजाराची ओळख करण्यासाठी हे साहित्य वापरता येईल.
- संख्यावाचन करता येईल. ● प्रत्येक अंकाचे स्थान सांगता येईल.
- स्थानिक किंमत सांगता येईल. ● विस्तारित मांडणी करता येईल.
- दोन अंक घेऊन बेरीज–वजाबाकी करता येईल. ● संख्याकार्ड घेऊन चढता–उतरता क्रम लावता येईल. यांसारख्या विविध कृतीतून विद्यार्थी अनुभव घेतील.

## २१) संख्याकार्ड – स्थानिक किंमत :

- संच क्रमांक ८१ मध्ये ग/८१/०१/०१ ते ग/८१/०१/०५, ग/८१/०२/०१ ते ग/८१/०२/०५ व ग/८१/०३/०१ ते ग/८१/०३/०५ या क्रमांकांची एकूण १५ कार्डस् आहेत.




- हे सराव साहित्य आहे. जो अंक अधोरेखित केला आहे, त्याची स्थानिक किंमत विद्यार्थ्यांनी सांगावी.

## २२) नोटा :

- संच क्रमांक १०१ मध्ये ग/१०१/०१ ते ग/१०१/१००, ग/१०१/०२ ते ग/१०१/५०, ग/१०१/०३ ते ग/१०१/५०, ग/१०१/०४ ते ग/१०१/२०, या क्रमांकाच्या २२० नोटा आहेत.


२० नोटा

५० नोटा

५० नोटा

१०० नोटा

- ठरावीक रक्कम तयार करता येणे.

उदा. : २१३२ रूपये




● खुलेरूप तयार करता येणे.
उदा. २५ रूपये



## २३) भौमितिक आकार :

संच क्रमांक ८२ मध्ये ग/८२/०१ ते ग/८२/१० या क्रमांकांची एकूण १० कार्डस् आहेत.



- भौमितिक आकार ओळखता येईल.
- भौमितिक आकारांच्या कडा व कोपरे मोजता येतील.
- टेपच्या, पट्टीच्या साह्याने आकृतीच्या बाजू मोजता येतील.
- दिलेल्या आकारांभोवती दोरा फिरवून परिमिती काढता येईल.
- आकृतीची परिमिती काढता येईल.

## २४) मापनटेप-(मीटर) :




या साहित्याचा उपयोग वस्तूंची लांबी, रुंदी मोजणे, परिमिती काढणे, मीटर संकल्पना स्पष्ट होणे, कापड मोजणे, क्षेत्रफळ काढणे इ. साठी करता येतो.

## २५) अंकपट्टी लगतची पुढील संख्या :

संच क्रमांक ८३ मध्ये ग/८३/०१ ते ग/८३/०६ या क्रमांकांची एकूण ०६ कार्डस् आहेत.

- हे साहित्य सरावासाठी आहे.
  उदा.




## २६) अंकपट्टी लगतची मागील संख्या :


- संच क्रमांक ८४ मध्ये ग/८४/०१ ते ग/८२/०६ या क्रमांकांची एकूण ०६ कार्डस् आहेत.

- हे साहित्य सरावासाठी आहे.
  उदा.




## २७) बेरीज-वजाबाकी कार्ड :

- संच क्रमांक ८५ मध्ये ग/८५/०१/०१ ते ग/८५/०१/०६
  या क्रमांकांची एकूण ०६ कार्डस् आहेत.





यामधून शाब्दिक उदाहरणे तयार करण्याचा अनुभव देता येईल. उदा. - माझ्याकडे तीन काड्या आहेत. आईने मला किती काड्या दिल्या, तर माझ्याकडे सात काड्या होतील?

## २८) बेरीजगाड्या :

संच क्रमांक ८६ मध्ये ग/८६/०१/०१ ते ग/८६/०१/०५, ग/८६/०२/०१ ते ग/८६/०२/०५, ग/८६/०३/०१ ते ग/८६/०३/०५ व ग/८६/०४/०१ ते ग/८६/०४/०५ या क्रमांकांची एकूण २० कार्डस् आहेत.


हे साहित्य सरावासाठी आहे.




## २९) वजाबाकीगाड्या :

संच क्रमांक ८७ मध्ये ग/८७/०१/०१ ते ग/८७/०१/०५, ग/८७/०२/०१ ते ग/८७/०२/०५, ग/८७/०३/०१ ते ग/८७/०३/०५, ग/८७/०४/०१ ते ग/८७/०४/०५ व ग/८७/०५/०१ ते ग/८७/०५/०५ या क्रमांकांची एकूण २५ कार्डस् आहेत.


हे साहित्य सरावासाठी आहे.




## ३०) गुणाकारगाड्या :

संच क्रमांक ८८ मध्ये ग/८८/०१/०१ ते ग/८८/०१/०५,
ग/८८/०२/०१ ते ग/८८/०२/०५, ग/८८/०३/०१ ते ग/८८/०३/०५,
ग/८८/०४/०१ ते ग/८८/०४/०५, ग/८८/०५/०१ ते ग/८८/०५/०५,
ग/८८/०६/०१ ते ग/८८/०६/०५ व ग/८८/०७/०१ ते ग/८८/०७/०५
या क्रमांकांची एकूण ३५ कार्डस् आहेत.


हे साहित्य सरावासाठी आहे.



## ३१) भागाकारगाड्या :

- संच क्रमांक ८९ मध्ये ग/८९/०१/०१ ते ग/८९/०१/०६, ग/८९/०२/०१ ते ग/८९/०२/०६, ग/८९/०३/०१ ते ग/८९/०३/०६, ग/८९/०४/०१ ते ग/८९/०४/०६, ग/८९/०५/०१ ते ग/८९/०५/०६ व ग/८९/०६/०१ ते ग/८९/०६/०६ या क्रमांकांची एकूण ३६ कार्डस् आहेत.

हे साहित्य सरावासाठी आहे.





## ३२) संख्यापट्टी-चढता-उतरता क्रम :

संच क्रमांक ५९ मध्ये ग/५९/०१/०१ ते ग/५९/०१/०५, ग/५९/०२/०१ ते ग/५९/०२/०५, ग/५९/०३/०१ ते ग/५९/०३/०५ व ग/५९/०४/०१ ते ग/५९/०४/०५ या क्रमांकांची प्रत्येक गटात ०५ कार्डस् प्रमाणे २० कार्डस् आहेत.

संख्येच्या स्थानाचा विचार करून संख्या चढत्या व उतरत्या क्रमाने लावता येतील.

उदा. : चढता क्रम लावा.




## ३३) मणिमाळ :



- मणिमाळेचा उपयोग १ ते १०० अंकांचे वाचन करणे. ● १०० पर्यंतची संख्या दाखवणे.
  उदा. मणिमाळेवर ५७ क्रमांकाचा मणी दाखविणे.





- या साहित्याने १०० पर्यंत अंक मोजणे, क्रमवाचक व मूल्यवाचक ओळखणे, टप्प्याने संख्या दाखवणे, बेरीज, वजाबाकी क्रिया करणे इत्यादीचा अनुभव देता येईल.
- मणिमाळ वर्गात विद्यार्थ्यांना सहज हाताळाता येईल एवढ्या उंचीवर समोर बांधावी. मणी मागे-पुढे सहज हलविता येतील, अशी वर्गात माळेची रचना करावी.

## ३४) कंपासपेटी (प्लॅस्टिक) :




● या साहित्याचा उपयोग भौमितिक आकार काढणे, कोन मोजणे, त्रिज्या, व्यास व परिमिती मोजणे इत्यादीसाठी करता येईल.

## ३५) शतक, दांडे, सुटे संच :

 = २  = २०  = १००  = २५  = १००

या साहित्याचा उपयोग एकक, दशक, शतक यांचा संबोध स्पष्ट करणे, सुटे-गठ्ठे समजणे, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार समजणे, स्थानिक किंमत, लहान-मोठेपणा समजणे इ. साठी करता येतो.





अपूर्णांक

 दशांश $\frac{1}{10}$  शतांश $\frac{1}{100}$  सहस्रांश $\frac{1}{1000}$

● संख्याज्ञान


उदा. ३२१ ची मांडणी करा.




● बेरीज

उदा. ४३+२८


कृती क्र.१





कृती क्र.२





कृती क्र.३




कृती क्र.४




## ३६) दशांश अपूर्णांक : अपूर्णांक कार्ड




● संख्याज्ञान

उदा. १२.३४५ याची मांडणी करा.



दशांश अपूर्णांक साहित्याने पुढील संकल्पनांचा अनुभव देता येईल.

● दशांश अपूर्णांकाचे लेखन, वाचन
● दशांश अपूर्णांकातील अंकांची स्थानिक किंमत
● दशांश अपूर्णांकांची तुलना, लहान, मोठेपणा
● दशांश अपूर्णांकांची बेरीज, वजाबाकी.

## ३७) माहिती व्यवस्थापन :

● या साहित्याचा वापर करून एका उदाहरणाची मांडणी शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून करून घ्यावी.




शिक्षकांनी प्रश्न विचारून चर्चा घडवून आणावी.

उदा. १. घोड्यांची संख्या किती आहे?

२. एकूण प्राण्यांची संख्या किती आहे?

● विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या उदाहरणात स्वतः प्रश्न तयार करावेत.
● चित्ररूप माहितीचे विद्यार्थ्याला विश्लेषण करता येणे. चर्चेच्या आधारे वरील माहितीवरून निष्कर्ष काढता येणे इत्यादी अनुभव विद्यार्थ्यांना देता येतील.

## ३८) व्यापार खेळ :



- उपकरणे : नवा व्यापार (बिझनेस इंडिया) या खेळाच्या बोर्डावर महाराष्ट्रातील प्रसिध्द शहरे आणि कंपन्या दर्शविल्या आहेत. या ठिकाणाच्या मालकी जागा वेगवेगळ्या रंगाच्या चार समुहात आहेत. बोर्डावर सुवर्णसंधी व सामुदायिक मोठी पेटी, वॉटर वर्ल्ड रिसोर्ट, स्पोर्ट्स क्लब इ. जागांचा समावेश आहे. खेळात दोन फासे आहेत. सोबत हिरव्या आणि लाल रंगात घरे दाखवले आहेत. तसेच वेगवेगळ्या रंगाची व प्रकारची सांकेतिक चिन्हे आहेत. प्रत्येक संपत्तीची अधिकारपत्रे वेगवेगळ्या रंगातील कार्डाच्या समुहात आहेत. रूपये पैसे, वेगवेगळ्या मुद्रा व्यापारात वापरता येण्यासाठी कागदी नोटांमध्ये प्राप्त करू शकतात.

- भांडवल : खेळाची सुरूवात करण्याअगोदर प्रत्येक खेळाडू समान रक्कम भांडवल म्हणून वाटून घेतील. ही रक्कम रूपये ३0000/- पासून ५0000/- रूपये पर्यंत असली पाहिजे. खेळाडू ठरवून ही रक्कम वाटून घेतील. खेळाच्या सुरूवातीला जर बँकेत काहीच शिल्लक नसेल तर खेळ सुरू झाल्यापासून बँकेत पैसे येणे सुरू होईल. खेळाडू एकामागून एक फासे टाकण्यास सुरूवात करतील.

- मालमत्ता खरेदी व विक्री : खेळाडू फास्यांच्या मदतीने ज्या जागेवर पोहचतो त्याची किंमत बँकेत देऊन ती मालमत्ता आपल्या ताब्यात घेऊ शकतो. जर त्या मालमत्तेवर दुसऱ्याचा अधिकार असेल तर त्याला त्या जागेचे भाडे द्यावे लागेल. बँक केवळ त्याच खेळाडूला जागेचे अधिकारपत्र देते जो सर्वात अगोदर पोहचून ती जागा खरेदी करतो. जर खेळाडू ती जागा खरेदी करू इच्छित नसल्यास किंवा पैशाच्याअभावी ती खरेदी करू शकत नाही, तेव्हा बँकेला त्या जागेचा लिलाव करून विक्री करण्याचा अधिकार असतो.

- मालमत्तेवर घर किंवा हॉटेल : आपल्याजवळील भांडवलावर अधिक नफा मिळवण्यासाठी घरे आणि हॉटेल बांधले जातात. प्रत्येक घर आणि हॉटेलची अधिकार पत्रावर दिली आहे. बँकेला ती रक्कम देऊन खेळाडू मालकी जागेवर घर किंवा हॉटेल बांधू शकतो. तसेच हिरव्या रंगात किल्ला, टोल टॅक्स आणि लाल रंगात घर, पॉवरलूम, निळ्या रंगात देऊळ, गार्डन, गेटवे, तर जांभळ्या रंगात गुरूव्दारा, अणुउर्जा प्रकल्प, दीक्षाभुमी दाखविली आहे. कोणत्याही मालकी जागेवर घर बांधण्यासाठी खेळाडूजवळ त्या रंग समुहाची कमीत कमी तीन अधिकारपत्रे असणे आवश्यक आहे. तर खेळाडू मुंबई, पुणे, गोवा या ठिकाणी मालमत्ता असेल तर तो त्या जागेवर घर बांधू शकतो. जर खेळाडू एकाच रंग समुहात तीन ठिकाणाचा मालक असेल, त्यावर कोणतेही घर किंवा हॉटेल नाही, तेव्हा तो खेळाडू दुप्पट भाडे वसूल करू शकतो. कोणत्याही जागेवर किंवा हॉटेल अधिक लाभ होतो.

- आयकर : कोणताही खेळाडू जेव्हा आयकरच्या जागेवर येतो तेव्हा त्याला प्रत्येक जागेतील रूपये ५0/- आयकर द्यावा लागेल. या कराची अधिकत्तम रक्कम रूपये ५00/- पर्यंत आहे.

## व्यापार खेळाच्या मागील बाजूस खालील खेळही दिलेले आहे.

१) सापशिडी :

सापशिडी हा पुरातन भारतीय खेळ आहे. या खेळामध्ये दोन किंवा दोनपेक्षा जास्त खेळाडू खेळू शकतात. प्रत्येक खेळाडू चौकोन नं.१ म्हणजेच सुरूवातीच्या चौकोनात वेगवेगळ्या प्रकारच्या सोंगटी ठेवतो. नंतर त्या प्याद्याला चाल देण्यासाठी फासे टाकून फास्यावर आलेल्या अंकाप्रमाणे आपल्या प्याद्याला चाल देतो. याप्रमाणे प्रत्येक खेळाडू ठरलेल्या क्रमाने फासे टाकतो. ही चाल देत असताना चौकोनात टाकलेल्या अंकाप्रमाणे डावीकडून उजवीकडे आणि खालून वर अशा प्रकारे चाल द्यायची असते.ही चाल देत असताना सोंगट्या फासे टाकल्यावर पडलेल्या अंकाप्रमाणे द्यायची असते. सोंगट्याच्या हालचाली होत असताना सापशिडी बोर्डवर काही घरात शिडीचे खालचे टोक आहे तर काही घरात सापाचे तोंड आहे. सोंगट्याला चाल देताना जर सोंगटी शिडीच्या पायथ्याशी पोहोचली तर त्या सोंगटीला त्या शिडीवर चढून जाता येते. याप्रमाणे त्या खेळाडूला पुढे जाण्यासाठी शिडीची मदत होते. त्याचप्रमाणे जर एखाद्या खेळाडूची सोंगटी पुढे जाताना जर सापाचे तोंड असलेल्या घरात पोहचली तर त्या खेळाडूची सोंगटी साप गिळतो आणि ती सोंगटी म्हणजेच तो खेळाडू त्या सापाची शेपटी ज्या घरात आहे तेथे पोहोचतो. ती सोंगटी तितकी मागे जाते. असे प्रत्येक खेळाडू एकानंतर एक खेळतो. अशा प्रकारे प्रत्येक खेळाडू दान टाकतो आणि त्याप्रमाणे त्याची सोंगटी पुढे मागे होत राहते. या सोंगट्यांच्या हालचाली मध्ये ज्या खेळाडूची सोंगटी सर्व प्रथम सापांचा अडथळा आणि शिडीचा उपयोग करून शेवटच्या घरात म्हणजेच चौकोन नं.१०० मधे पोहोचतो तो विजयी होतो.

२) लुडो :

हा खेळ भागीदारी न करता दोन तीन किंवा चार जण खेळू शकतात. सर्वप्रथम जितके खेळाडू असतील तितक्या रंगांच्या सोंगट्यांची निवड करा. नंतर प्रत्येक खेळाडू फासे टाकता ज्या खेळाडूच्या फास्यावर सहा अंक येतो तो खेळ सुरू करतो. बोर्डावर दाखवल्याप्रमाणे प्रत्येक खेळाडू आपल्या सोंगट्या आपल्या रंगाच्या चौकोनामध्ये मांडतो. नंतर फासे टाकून बाणाने दाखवलेल्या दिशेने सोंगटीला पुढे चाल देतो. ह्या सोंगट्याच्या हालचालीमध्ये दोन खेळाडूच्या सोंगट्या एकाच चौकोनात आल्या तर त्या चौकोनातील पूर्वी असलेल्या खेळाडूची सोंगटी पुन्हा सुरूवातीच्या घरात ठेवली जाते. अशाप्रकारे खेळाडू एकमेकांच्या सोंगट्यांचा पाठलाग करतात. शेवटी ज्या खेळाडूची सोंगटी सोंगट्यांच्या शर्यतीमध्ये सर्वप्रथम अंतिम घरात पोहोचते तो खेळाडू विजयी होतो.

३) डावपेच (नाईन मेन मॉरीस)

या खेळाला नाईन मेन मॉरिस पण म्हणतात. हा खेळ दोन खेळाडूसाठी आहे. यासाठी गेम बोर्ड आणि प्लास्टिक टोकणाचा वापर होतो. हा खेळ खेळण्याच्या तीन स्टेप्स आहेत. स्टेप १) बोर्डवर टोकण ठेवणे. (माणसे) एकावेळी एक असे एकानंतर एक खेळाडू खेळतो. स्टेप २) माणसांची हालचाल आणि स्टेप ३) खेळाडू आपली तीन माणसे बोर्डवर एका सरळ रेषेत आणण्याचा प्रयत्न करतात. याला मिल असे म्हणतात. एखाद्या खेळाडू आपली नऊ माणसे बोर्डवर प्रस्थापित करू शकतात. खेळाडू एका नंतर एक खेळतो. खेळाडू आपल्या माणसांची हालचाल बोर्डवरच्या रिकाम्या जागेत करू शकतो. एखादी रिकामी जागा विरोधी खेळाडूच्या टोकणवरून उडी मारून पण घेता येते. जेव्हा विरोधी खेळाडूचे फक्त दोन माणसे बोर्डवर उरतात. तेव्हा तो खेळाडू हरला असे समजले जाते. अशाप्रकारे हा खेळ खेळला जातो.

४) बुध्दी कौशल्य

हा खेळ एकट्याने खेळायचा आहे. यामधे ३३ घरे असतात. मध्यभागी एक घर रिकामे असते. प्रत्येक घरावर टोकण ठेऊन खेळाला सुरूवात करता येते. रिकाम्या घरापासून एका आड एक टोकण उचलत राहणे. टोकण उचलत असताना टोकण असलेले एक घर सोडून पुढचे घर रिकामे असणे आवश्यक आहे. अशाप्रकारे आपले बुध्दीचातुर्य वापरून सर्व टोकण उचलणे. शेवटी एक टोकण मध्यभागी असलेल्या घरात राहिले पाहीजे.